REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# मराठी ग्रंथालय एक पर्यटन

**जाधव ए. जे.**
**सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा.**

**सारांश**


टॉलस्टॉय हा विचारवंत असे म्हणतो की, "माझ्या जीवनात मला तीन गोष्टी सर्वात महत्त्वाच्या वाटतात त्या म्हणजे पुस्तके, पुस्तके आणि पुस्तके..." ग्रंथालय म्हणजे मानवाने कष्टपूर्वक मिळवलेल्या ज्ञानभांडाराचे जाणीवपूर्वक जतन करून ठेवणाऱ्या, संवर्धन करणाऱ्या ज्ञानपेढ्या आहेत .सध्याच्या माहितीच्या युगात विश्वसनीय खात्रीशीर अचूक माहिती देणारे ज्ञानदूत आहेत. देशाची संपन्नता ही त्या देशाच्या उत्पादनशीलतेवर निर्यातीवर मोजली जाते परंतु देशातील समाजाच्या उन्नतीचे मोजमाप मात्र समाजाचा सुसंस्कृतपणा, सृजनशीलता याच गोष्टीवर केले जाते वाचनाने समाजाची सर्वांगीण उन्नती होऊन सुसंस्कृतताव सृजनशीलतावाढीस लागते.

एखादे दुर्मिळातील दुर्मिळ पुस्तक पाहाणे, त्याला हाताळणे यासारखा दुसरा आनंद नाही. प्राचीन काळी भूर्जपत्रावर लिहिलेली कागदावर, कापडावर छापलेली पुस्तके आपणास दिसून येतात अशी पुस्तके पहाणे हा सुखाचा व ज्ञानाचा अमूल्य ठेवा असतो. त्यादृष्टीने मराठी भाषेतीही अनेक जुनी ग्रंथलये आहेत. त्यांचा पर्यटनाच्या दृष्टीने अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

**उद्दिष्टे**

१. एक मराठी भाषेतील ग्रंथालयाचा शोध घेणे.
२. मराठी भाषेतील ग्रंथालयाचे महत्व निदर्शनास आणणे.
३. संशोधनाच्या दृष्टीने मराठी भाषेतील ग्रंथांचे महत्त्व विशद करणे.

सांस्कृतिक ज्ञानाच्या दृष्टीने ग्रंथालयाचे महत्व आहेच संस्काराच्या दृष्टीनेही ते महत्त्व आहे.



**मराठी भाषेतील पहिले ग्रंथालय**

याची स्थापना १ जून १८९३ मध्ये ठाणे येथे करण्यात आली. वि.ल. भावे, विष्णू भास्कर जाधव यांनी या ग्रंथालयाची स्थापना केली. त्यासाठी त्यांनी मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे या संस्थेची स्थापना केली. या संस्थेद्वारे हे मराठी भाषेतील आद्य ग्रंथालय उभे राहिले. १,४०,००० पुस्तके या ग्रंथालयात आहेत. १९०० पूर्वीची १४६० दूर्मिळ पुस्तके येथे उपलब्ध आहेत.

**हस्तलिखितांचा संग्रह या ग्रंथालयाने जपून ठेवला आहे. महाराष्ट्रातील पितृस्थानी असलेले ग्रंथालय अशा शब्दात या ग्रंथालयाचा गौरव वि स खांडेकर यांनी केला आहे.**

## मुंबई मराठी ग्रंथालय :

**मुंबई मराठी ग्रंथालयाची स्थापना १ ऑगस्ट १८९८ रोजी झालेली आहे. नायगाव दादर येथे मध्यवर्ती ग्रंथालय कार्यालय आहे. या ग्रंथालयाचा ३१ विभागातून विविध कार्ये चालतात. इतिहास संशोधन मंडळ, मराठी संशोधन मंडळ या दोन संलग्न संस्था संशोधनपर कार्य करून तिमाही संशोधन पत्रिका प्रसिद्ध करतात. दोन लाखावर लाखाहून अधिक ग्रंथसंपदा दुर्मिळ १२ हजार ग्रंथ, ८८९ दोला मुद्रिते यांनी संदर्भ विभाग समृद्ध झालेला आहे. शिवाय ग्रंथपालन वर्ग, मराठी लघुलेखन वर्ग उत्तम प्रकारे चालविले जातात.१**

## तंजावर लायब्ररी.

**सरस्वती महाल शिवाजी राजे यांच्या नात्यातील सरकोजी राजे (१७९९ ते १८३२) हे होऊन गेले. त्यांनी सरस्वती महाल या ग्रंथाची निर्मिती केली. जगातील सर्वात मोठा शिलालेख त्यांनीच येथील प्रख्यात अशा बृहदेश्वर मंदिरात कोरविला आहे. त्यात भोसले वंशाचा इतिहास मराठी भाषेत दिला आहे सरकोजी राजे यांच्या साहित्कि अभिरूचीमुळेच ६० हजाराहून अधिक मराठी, संस्कृत आणि अन्य भाषांतील दुर्मिळ पुस्तके आणि हस्तलिखिते येथे आहेत. विविध विषयावरील तीन लक्षाहून अधिक पुस्तके येथे उपलब्ध आहेत.**

**शिवरायांच्या आज्ञेनुसार कवी परमानंद यांनी लिहिलेले शिवचरित्र या मूळ ग्रंथाची अस्सल प्रत येथे आजही आहे. तंजावरच्या ग्रंथालयात एक ग्रंथ असा विस्मयचकित करणारा आहे की त्याच्या ओळी उजवीकडून वाचल्या तर रामायण. डाविकडून वाचल्या तर महाभारत आणि वरून खाली वाचल्या तर श्रीमद् भागवत आहे. ताडाच्या, पामच्या पानावर लिहिलेले पुरातन ज्योतिष शास्त्र व इतर ग्रंथ जतन करून ठेवले आहेत.२**

**सुमारे २५०००० ताडपत्रावरील हस्तलिखिते तर २४००० कागदावर हस्तलिखिते अकराव्या शतकातील जमिनी सूत्रावरील भाष्य असणारे खलावती हे ताडपत्रावरील सर्वात जूने हस्तलिखित व १४६८ साली लिहलेले हे कागदावरील सर्वात जूने हस्तलिखित बघायला मिळते.३**

**आशिया खंडातील सर्वात जुने ग्रंथालय म्हणून प्रख्यात असणाऱ्या ग्रंथालयास आयुष्यात एखदा तरी भेट दयायलाच हवी. या ग्रंथालयाची इमारत ही अत्यंत देखणी व प्रेक्षणीय आहे. येथे आपणास पदोपदी सरफोजी राजे यांच्या उच्च अभिरूचीची सतत जाणीव होत राहते.**

## भांडारकर प्राच्य विद्या, विद्या संशोधन मंदिर पुणे

**या ग्रंथालयाची स्थापना ६ जुलै १९१७ झाली. ही संस्था प्राकृत व संस्कृत हस्तलिखितासाठी प्रसिद्ध आहे सव्वा लाखाहून जास्त पुस्तके २९५०० दहा हूनअधिक हस्तलिखितांचा संग्रह पहावयास मिळतो हस्तलिखित संवर्धन केंद्र ही तेथे आहे.४**

## भिलार गाव- पुस्तकांचे गाव

**भिलार हे गाव महाराष्ट्रातील पुस्तकाचे गाव म्हणून प्रसिद्धीस आले आहे या गावात महाराष्ट्र शासनाच्या राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने पुस्तकाचा गाव हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. हे जगातील दुसरे (पहिले ब्रिटनमधील हे - ओन वे हे गाव आहे. जे आपल्याकडे असणाऱ्या पुस्तकांच्या संग्रहाबद्दल प्रसिद्ध आहे.) आशिया खंडातील आणि भारतातील पहिले पुस्तकांचे गाव भिलार गावी आहे४**

**निष्कर्ष :**

१. मराठी भाषेतील काही मोजकीच ग्रंथालय आहे ग्रंथांचे जतन करून ठेवतात.

२. पर्यटनाच्यात्दृष्टीने ग्रंथालयाचे खूप महत्व आहे या ग्रंथालयांना भेट देणे म्हणजे आपणास ज्ञान समृद्ध करून घेण्यासारखे आहे.

३. वरील ग्रंथालयाचे संशोधनाच्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्व आहे. मूळ संदर्भ पाहून केलेले संशोधन अधिक विश्वसनीय असते. असे विश्वसनीय पुरावे उपलब्ध करून देण्याचे कार्य ही ग्रंथालये प्रामाणिकपणे करत असतात.

**समारोप :**

ग्रंथालये ही खरेतर समाजाचा संस्कृतीचा मानवाच्या विकासातील प्रामाणिक वाटाड्याआहे भूतकाळ वर्तमानकाळ भविष्यकाळ जाणून घेण्यासाठी ग्रंथालया सारखे प्रभावी साधन नाही म्हणून अशा ग्रंथालयांना भेट देणे म्हणजे मानवी जीवनाची सर्वोच्च सार्थकता प्राप्त करणे होय. म्हणून ग्रंथालय भेट हे पर्यटन म्हणून विकसीत करणे महत्वाचे आहे.

**संदर्भ :**


१. प्रेम मुळे यांच्या ब्लॉगवरून साभार

२. कुलदिप पाटील यांचा लेख

३. www.saamana.com.

४. विकीपीडियावरून साभार

५. www.loksatta.com/pune.